परवानगी वर्ष/ २०००-२००१
माध्यम: मराठी/ विनाअनुदान

जा.क्र. माध्य.३(१४)/प्रथम मान्यता/पुवि/२००२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 8 OCT 2002

४६१७०१७

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

विषय : प्रथम मान्यता. . .
शाळा पद्मावती
श्री. विद्या मंदीर उर्से ता. मावळ जि. पुणे.

संदर्भ : आपले पत्र क्रमांक :
१. शिक्षण/ माध्य/ ई-३/ प्र. मा/ ०२-०३ दि. १.१०.२००२
२. शा.प.क्र. नमाशा-२००१[५३७/ २००१]माशि-१ दि. ३०.८.२००१
३. क्र. माध्य-३/१४/ नमाशा/ मा-पता/ पुवि/ ०२, दि. २३.९.२००२

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये मावळ शिक्षण प्रतिष्ठान, तळेगांव दाभाडे, पुणे. श्री. पद्मावती विद्यामंदीर, उर्से ता. मावळ जि. पुणे. संस्थेच्या ------------------------------------------------------ माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८ वी/~~९ वी/ १० वी/ ११ वी~~ च्या वर्गास २०००- २००१ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००० पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटोंची पूर्तता अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटोंची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटो पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटो पुर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

विना अनुदान

१. संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५ विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.

स्थळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक
यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : मुख्याध्यापक, श्री. पद्मावती विद्यामंदीर, उर्से ता. मावळ, जि. पुणे.